सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, परभणी
पहिला माळा A (विंग) नविन प्रशासकीय इमारत, प्रियदर्शनी इंदिरा गांधी क्रिडा संकूल जवळ, परभणी
जाक्र/जिप/साप्रवि/कार्यासन-८/कावि/ 43 /२०२६ दिनांक ०९/०३/२०२६
Email id dyceogzppbn@gmail.com

# प्रेसनोट

**विषय : परभणी जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवड प्रक्रिये बाबत विशेष सभा दिनांक १८.०३.२०२६**

परभणी जिल्हा परिषद येथील अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांच्या निवडीसाठी बुधवार १८ मार्च २०२६ रोजी विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. ही सभा दुपारी ०२.०० वाजता जिल्हा परिषद परभणी येथील सभागृहात पार पडणार आहे.

मा.जिल्हाधिकारी परभणी यांच्या आदेशानुसार ही निवड प्रक्रिया राबविण्यात येत असून सभेचे अध्यक्षस्थान पिठासीन अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी परभणी श्रीमती शोभा जाधव भूषविणार आहेत. सभेत निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणानुसार प्रथम अध्यक्ष पदाची निवड करण्यात येईल. त्यानंतर उपाध्यक्ष पदाची निवड प्रक्रिया पार पडेल. निवडणूकीसाठी इच्छुक उमेदवारांकडून नामनिर्देशन पत्रे दिनांक १८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत सभास्थळी स्विकारली जाणार आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये निवडून आलेल्या परभणी जिल्हा परिषदेच्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांनी दिनांक १८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता परभणी जिल्हा परिषद सभागृहात उपस्थित रहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

( डॉ.संदीप घोन्सीकर )
**सचिव तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)**
**जिल्हा परिषद, परभणी**